

*श्रीमती प्रयाग कराड विश्वशांती गुरूकुल शैक्षणिक सुंकुलाचे उद्घाटन करताना शिक्षणमंत्री वसंतराव पुरके, त्यांच्यासमवेत रामराजे निंबाळकर, केंद्रीय राज्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, शिवाजीराव भोसले, प्रभाताई झाडबुके, डॉ. विश्वनाथ कराड, वर्षा ठोंबरे आदी.*

## गुणवत्ता व दर्जा वाढविण्यास शिक्षणाची गरज : पृथ्वीराज चव्हाण

जागतिकीकरण, वैश्वीकरण, आणि वाढत्या स्पर्धेत टिकून राहण्यासाठी इंग्रजीचे ज्ञान आवश्यक असून शहरी व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये वरचेवर

शिक्षणात वाढत चाललेली दरी कमी करण्यासाठी गुणवत्ता आणि दर्जा वाढविण्यास शिक्षणाची गरज असल्याने प्रतिपादन केंद्रीय संसदीय कामकाज राज्यमंत्री पृथ्वी चव्हाण यांनी केले.

माईर्स एमआयटी पुणे यांच्यावतीने बार्शी येथे नव्याने उभारण्यात आलेल्या श्री सरस्वती विद्यानगरी शैक्षणिक संकुलातील इंग्रजी माध्यमाच्या श्रीमती प्रयाग कराड विश्वशांती गुरूकुल उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी जलसंपदा विभागाचे मंत्री रामराजे निंबाळकर हे होते.

यावेळी शालेय शिक्षणमंत्री वसंतराव पुरके, छत्रपती शिवाजीराव भोसले (सातारा), ह.भ.प, शेलार मामा, वेदांत शास्त्रांचे अभ्यासक पंडीत गाडगीळ, श्री. रेणसिध्द शिवाचार्य परंडकर महाराज, संस्थापक अध्यक्ष डॉ.विश्वनाथ कराड, प्रयाग कराड, माजी आमदार प्रभाताई झाडबुके, माजी राज्यमंत्री दिलीप सोपल, आमदार राजेंद्र राऊत, नगराध्यक्ष श्रीकांत पिसे आदी उपस्थित होते.

**इंग्रजीचा प्रसार आवश्यक : पुरके**

वैज्ञानिक दृष्टीचा स्वीकार केल्याशिवााय पयार्य नाही, असे सांगून शिक्षणमंत्री पुरके म्हणाले की, शिक्षणामुळे चांगले वाईट ज्ञान देण्याची सद्‌विवेक बुध्दी मिळते. आज महाराष्ट्राचा विचार केला तर इंग्रजीमुळे मराठी माणूस आंतरराष्ट्रीय स्पर्धेत टिकत नाही, त्यासाठी इंग्रजीचा प्रसार झाला पाहिजे. ज्या शिक्षणाची गरज २१ व्या शतकामध्ये याचा विचार करूनच डॉ. विश्वनाथ कराड

यांनी बार्शी सारख्या ग्रामीण भागात इंग्रजी माध्यमाचे गुरूकुल स्थापन करून पुण्याने जसे शिक्षण क्षेत्रात वेगळे स्थान निर्माण केले तसे या गुरूकुलने सुध्दा वेगळा ठसा निर्माण करावा, असे सांगून जलसंपदा मंत्री रामराजे निंबाळकर म्हणाले की, केंद्र शासनाच्या मदतीची गरज असल्याने त्यासाठी महाराष्ट्राला सर्वातरी सहकार्य करावी, अशी मागणी पृथ्वीराज चव्हाण यांच्याकडे केली.

प्रांरभी उपस्थितांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून नामफलकाचे अनावरण करण्यात आले. त्यानंतर डॉ.कराड यांच्या हस्ते उपस्थितांना एक किलो वजनाचा चांदीची संत ज्ञानेश्वर माऊलींची मूर्ती, शाल, श्रीफल च पुष्पाहार देऊन करण्यात आला. यावेळी ह.भ.प. शेलारमामा, पंडित गाडगीळ, रेवणसिध्द परंडकर महाराज यांनी आशीवार्दपर मार्गदर्शन केले. प्रभाताई झाडबुके व बाळासाहेब बडवे यांनी मनोगत व्यक्त केले.

डॉ. विश्वनाथ कराड यांनी स्वागतपर भाषण केले. प्रास्तविक प्राचार्य एम. एम.गणचार्य यांनी केले. सुत्रसंचालन प्रा.सुधीर राणे, वर्षा ठोंबरे यांनी केले तर आभार प्रा.मंगेश कराड यांनी मानले. यासाठी वर्षा ठोंबरे, सुरेश गोंदने, पंचाक्षरी गाढवे, प्रा.मंगेश कराड आदींनी परिश्रम घेतले.